ARTHA Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B 3464. Licence No. 53.

वर्ष २३ पुणें, बुधवार तारीख १७ जुलै, १९५७ अंक २९

## विविध माहिती

**हरिजन विद्यार्थ्यांसाठीं वसतिगृहें**—केरळच्या सरकारनें हरिजन विद्यार्थ्यांची सोय करण्यासाठीं राज्यांत ठिकठिकाणीं वसतिगृहें स्थापन करण्याचें ठरविलें आहे. एकूण १५ वसतिगृहांपैकीं ६ कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठीं व ९ शाळांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं आहेत. हरिजन विद्यार्थ्यांना भोजनाचा खर्चहि पडणार नाहीं.

**जपानी भातशेतीची पद्धत**—मुंबई सरकारनें सुरत जिल्ह्यांतील चिखली तालुक्यापैकीं १५ खेडेगांवांतून जपानी पद्धतीनें भातशेती सुरू करण्याचें ठरविलें आहे. एकूण ६,००० एकर जमिनींत हा प्रयोग करून पहाण्यांत येणार आहे. ह्या प्रयोगापायीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत १२ लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**तिबेटमधील लोखंडाचा कारखाना**—तिबेटमधील पहिला लोखंडाचा कारखाना ल्हासाच्या उत्तर उपनगरांत सुरू करण्यांत आला आहे. ह्या कारखान्यांत शेतीचीं अवजारें व छोटी यंत्रसामुग्री तयार करण्यांत येईल. चीनच्या सरकारनें ल्हासा येथें एक जलविद्युत् केंद्रहि स्थापन केलें आहे.

**कॅन्सर विषयक संशोधन**—विजयवाडा येथील एका आयुर्वेदीय संस्थेला कॅन्सरविषयक संशोधन करण्यासाठीं भारत सरकारनें २०,००० रुपयांची देणगी दिली आहे. ह्या कामासाठीं स्थापन करावयाच्या इस्पितळांत प्रारंभीं १० रुग्णांची सोय करण्यांत येईल.

**म्हैसूर राज्यांत गुरांचें कॉलेज**—म्हैसूर राज्यांत गुरांना औषधोपचार करण्यासाठीं एक कॉलेज काढण्यांत येणार आहे. सध्यां जागेची पहाणी चालू आहे. बहुधा तें बंगलोर जवळ निघेल. कॉलेजची स्थापना करण्यासाठीं ४० लाख रुपये लागतील असा अंदाज आहे.

**बेळगांव जिल्ह्यांत साखरेचा कारखाना**—म्हैसूर राज्यांत काढण्यांत यावयाच्या ६ साखर कारखान्यांपैकीं एक कारखाना बेळगांव जिल्ह्यांतील अंकली ह्या गांवीं काढण्यांत येणार आहे. संकल्पित कारखान्यामुळें ५४ गांवांतील शेतकऱ्यांच्या उसाला कायमचें गिऱ्हाईक लाभेल.

**प्रायोगिक टेलिव्हिजन केंद्र**—काटकसर करण्याच्या धोरणास अनुसरून मुंबई येथें दूरदर्शन केंद्र उघडण्याचा विचार रद्द करण्यांत आला आहे. तथापि माहिती व नभोवाणी खातें दिल्ली येथें असें एक प्रायोगिक केंद्र मात्र उभारणार आहे. केंद्राच्या उभारणीसाठीं २-३ लक्ष रुपयांपेक्षा अधिक किंमतीचें विदेशी चलन लागणार नाहीं.

**गिरण्यांच्या उत्पादनांत वाढ**—चालू सालच्या पहिल्या पांच महिन्यांत भारतामधील कापडाच्या गिरण्यांतील उत्पादन वाढत असल्याचें दिसून आलें आहे. त्याचप्रमाणें कापडाच्या निर्यातींतहि वाढ झालेली आहे. जानेवारी ते मे अखेर २२८·५ कोटी वार कापडाचें उत्पादन करण्यांत आलें. ह्याच काळांत ४०·२५ कोटी वार कापड निर्यात करण्यांत आलें.

**सतारिआचें कौतुक**—सुप्रसिद्ध हिंदी सतारिआ श्री. रविशंकर सध्यां पश्चिम जर्मनीच्या दौऱ्यावर आहेत. एसेन ह्या शहरांत त्यांनीं सतारवादनाचा दोन तासांचा जलसा केला. जलशाच्या अखेरीस ४०० संगीतप्रेमी श्रोत्यांनीं त्यांचें पुन्हां पुन्हां कौतुक केलें.

**खर्च व संपत्तिकर**—अंदाजपत्रकांत जाहीर करण्यांत आलेला खर्च-कर व संपत्ति-कर ह्यांच्या कक्षेंतून भारतामधील माजी संस्थानिकांना वगळण्यांत आलेलें नाहीं असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. ह्या बाबतींत जीं बिलें पार्लमेंटमध्यें मांडण्यांत आलीं आहेत त्यांत संस्थानिकांचा खास अपवाद केलेला नाहीं.

**बंगलोरमधील गलिच्छ वस्त्या**—म्हैसूर राज्यांतील गलिच्छ वस्त्या सुधारण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें ५६ लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. ह्या रकमेपैकीं ४० लाख रुपयांची रक्कम बंगलोर कॉर्पोरेशनच्या हद्दींतील गलिच्छ वस्त्या सुधारण्यासाठीं राखून ठेवण्यांत आली आहे.

**पगारांत कपात करण्यास नकार**—मध्यप्रदेश विधानसभेंतील कॉंग्रेसपक्षीय आमदारांनीं आपल्या पगारांत १० टक्के कपात करून घेण्यास विरोध केला आहे. त्यांच्या मतानें, राज्याचें वरिष्ठ सभागृह रद्द करून आणि बड्या सरकारी अधिकाऱ्यांच्या वेतनांत कपात करून अधिक चांगली बचत करतां येईल.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### मरणोन्मुख मुलांबरोबर जागतिक प्रवास

रेड स्केल्टन ह्या सुप्रसिद्ध अमेरिकन विनोदी नटाचा नऊ वर्षांचा मुलगा रिचर्ड हा असाध्य रोगानीं ( ल्युकेमिया, रक्ताचा कॅन्सर ) आजारी आहे. डॉक्टरांच्या मतें त्याला फारच थोडें आयुष्य उरलें आहे. मृत्यु येण्यापूर्वी त्याला शक्य तेवढें सुख देण्याकरितां रेड स्केल्टननें आपलें सिनेमांतलें व टेलिव्हिजनचें काम बंद ठेवलें आहे व स्वतःला मुलासाठीं वाहून घेतलें आहे. न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, इत्यादि शहरांतील मनोरंजक ठिकाणें त्याला दाखवून, ह्या प्रेमळ पित्यानें आतां युरोपचा ६० दिवसांचा प्रवास आरंभला आहे. पूर्व आशियाचाहि प्रवासांत अंतर्भाव केला जाईल. " नऊ वर्षांच्या मुलाला जगांतील जें जें काय पहावेंसें वाटेल, तें तें त्याला दाखविणें " हा रेड स्केल्टनचा उद्देश आहे.

### शेंकडा २० विद्यार्थ्यांचे डोळे अधू; शेंकडा ४० विद्यार्थ्यांची वाढ अपुरी

गुजरात विद्यापीठानें २६ कॉलेजांतील ५,३०० विद्यार्थ्यांची पहाणी केली, तेव्हां असें आढळून आलें कीं, शेंकडा २० विद्यार्थ्यांचे डोळे अधू असून त्यांना चष्म्यांची आवश्यकता आहे. सकस अन्नाचे अभावीं अपुरी वाढ झालेल्या विद्यार्थ्यांचें प्रमाण शेकडा ४० आहे.

### भक्तगणांचें काम ट्रॅक्टरनें केलें

जगन्नाथाचा रथ परत ओढण्यासाठीं पुरेसे भक्त न असल्यामुळें, एका ट्रॅक्टरचा त्यासाठीं उपयोग करावा लागला !

### आगबोटीचें नांव बदललें !

लेनिनग्रॅड, कोपनहेगन आणि लंडन ह्यांचे दरम्यान वक्तशीर वहातूक करणाऱ्या ' मोलोटाव्ह ' ह्या रशियन आगबोटीचें नांव बदलून ' बाल्टिका ' हें नवें नांव ठेवण्यांत आलें आहे. मोलोटाव्हची कम्युनिस्ट पक्षाच्या प्रेसिडियममधून नुकतीच हकालपट्टी झालेली आहे.

### रिझर्व्ह बँकेच्या ॲग्रि. क्रेडिट ( लाँगटर्म ऑपरेशन्स ) फंडांतून दिलेलीं कर्जें

वरील फंड १९५६ मध्यें स्थापन झाला, तेव्हांपासून त्या फंडांतून राज्य सरकारांना सहकारी क्रेडिट संस्थांचे भाग खरीदण्यासाठीं २८९·७० लक्ष रुपये मंजूर करण्यांत आले. त्यांपैकी १६०·४५ लक्ष रुपये राज्य सरकारांनीं प्रत्यक्ष घेतले आहेत. ११ राज्यांपैकीं ८ राज्यांनीं मंजूर रकमेचा फायदा करून घेतला आहे. राज्य सहकारी बँकांना मध्यम मुदतीचीं कर्जें म्हणून ३३०·५३ लक्ष रु. मंजूर करण्यांत आलें. त्यांपैकी १६८·३७ लक्ष रुपयांची प्रत्यक्ष उचल करण्यांत आली. ३० जून रोजीं ह्या फंडांत २० कोटी रु. शिल्लक आहेत.


॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

# डिस्टिलरी चालूं झाली

गेल्या हंगामांत १,८१,४७४ पोतीं साखरेचें उत्पादन झालें त्याची रुपये दीड कोटीवर किंमत येईल.

—ठेवी स्वीकारल्या जातात—

—संचालक मंडळ—

दि. ब. एन्. सी. लिमये, B. A., LL. B., C. B. E., अध्यक्ष.

श्री. आ. पां. कोंडे देशमुख
श्री. शं. ल. लिमये B. Sc., LL. B.
श्री. म. ग. भाडुले B. Sc., LL. B.
श्री. शं. भ. कोंडे देशमुख
श्री. ग. ह. रुवनीस

रा. ब. अ. गुं. गोखले M. A., B. Sc., F. R. I. C., A. I. I. Sc.
श्री. दा. वा. पोतदार B. E. ( Mech. ), B. E. ( Elec. ), A. M. I. E.
श्री. श्री. र. केसकर
श्री. रामराव देशमुख M. A., LL. B., ( Cant. ) Bar-at-Law, M. P.
श्री. शं. ल. किर्लोस्कर

९८० सदाशिव पेठ,
लक्ष्मीपथ, पुणें २.
दिनांक ११-७-१९५७

के. व्यं. चांफेकर
B. E., A. M. I. E.
मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १७ जुलै, १९५७



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रशिआ–जर्मनी व्यापारी करार कां होत नाहीं ?

कांहीं महिन्यांपूर्वी रशिअन सरकारनें पश्चिम जर्मन सरकारला एक खलिता पाठवून उभयतां देशांत एक व्यापारी करार करण्याविषयीं बोलणीं सुरू करण्याची विनंती केली होती. गेल्या महिन्याच्या १५ तारखेस अशा प्रकारचीं बोलणीं करण्याची तयारीहि पश्चिम जर्मन सरकारनें दाखविली होती. पण त्यानंतर रशिआंत असलेले सर्व जर्मन नागरिक परत धाडल्याशिवाय बोलणीं सुरू करण्यांत येणार नाहींत, असा खुलासा जर्मन सरकारनें केला आहे. जर्मनींतील सत्तारूढ पक्षाचें हें मत विरोधी सोशल डेमोक्रॅटिक पक्षाला मान्य नाहीं. त्या पक्षाचें म्हणणें असें कीं व्यापारी बोलणीं प्रथम चालूं करावीं म्हणजे उभयतां देशांतील संबंध सुधारूं लागतील आणि राजकीय प्रश्न सुटण्यास अनुकूल वातावरण तयार होईल.

खुद्द जर्मनींतील आर्थिक परिस्थिति सध्यां तरी अतिशय भरभराटीची आहे. पोलादाच्या उत्पादनाच्या बाबतींत जर्मनीचा अनुक्रम युरोपांत पहिला व जगांत तिसरा लागत आहे. मोटारी व विविध प्रकारची यंत्रसामुग्री ह्यांच्या उत्पादनांत जर्मनीचा दुसरा अनुक्रम लागतो. जर्मनींतील बेकारांची संख्या अवघी ५ लाख म्हणजे एकूण लोकसंख्येच्या अवघी १ टक्का आहे. एकंदरीनें जर्मनीची आर्थिक परिस्थिति सुदृढ असतांना न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंजनें जर्मन उद्योगपतींना एक मोठा धक्काच दिला आहे. जर्मन कंपन्यांचे शेअर स्टॉक एक्सचेंजच्या अधिकृत यादींत असूं नयेत असा नियम करण्यांत आला आहे. ह्या नियमाला कारण असें देण्यांत आलें आहे कीं, जर्मन कंपन्या आपल्या ताळेबंदांत कंपन्यांच्या नफ्यातोट्याची खरी कल्पना देत नाहींत. ह्या नियमामुळें जर्मन उद्योगपतींमध्यें नैराश्याचें वातावरण पसरलें आहे. अशा परिस्थितींत रशिआशीं व्यापारी करार करण्याबाबत ताणून का धरण्यांत येत आहे ह्याबद्दल खुद्द जर्मनींतच तर्ककुतर्क करण्यांत येत आहेत. जर्मनीकडून अधिक माल घेण्यास तयार असल्याचें रशिआनें स्पष्ट केलेलें आहे. रशिआ घेतलेल्या मालाचे पैसे वेळेवर चुकते करतो, ह्याविषयींहि शंका घेतली जात नाहीं. त्यामुळें तर व्यापारी कराराबाबतच्या जर्मन सरकारच्या धोरणाबद्दल कुतुहल वाढलें आहे. ह्यासंबंधीं थोडाबहुत प्रकाश जर्मन सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या खाजगी बोलण्यांतून पडतो. ते म्हणतात कीं जर्मनी आज एक सघन राष्ट्र असून आयातीपेक्षा त्याची निर्यात कितीतरी अधिक आहे. ह्याचा अर्थ असा कीं जर्मनीच्या मालाला पुरवठ्यापेक्षा अधिक मागणी असल्यानें तो कोणाला विकावयाचा ह्याबद्दल जर्मनीला आज तरी अधिक स्वातंत्र्य आहे. पण आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची हीच परिस्थिति किती काळ टिकेल ह्यासंबंधीं ते विचार करीत नाहींत, अशी टीका करण्यांत येत आहे.

दरम्यान, जर्मन वृत्तपत्रांतून रशिआ व जर्मनी ह्यांच्यामधील व्यापार चांगला फोफावल्याच्या व तो असाच वाढत जाणार असल्याच्या वार्ता प्रसिद्ध होत आहेत. मात्र हा व्यापार मध्यस्थामार्फत होत असतो. जर्मनी व रशिआ ह्यांच्यांतील व्यापारी संबंध उघड करूं नयेत असा तर पश्चिम जर्मनीचा उद्देश नसेल ना ?

---

## परकीय नागरिकांवर कर आकारणी

भारताच्या सरकारनें संपत्तीवर व खर्चावर कर बसविल्यावर त्याविरुद्ध बरीच टीका करण्यांत आली. पण अंदाजपत्रकांतील तूट भरून काढण्यासाठी आशिआंतील इतर देशसुद्धां कराच्या नवनव्या बाबी शोधून काढीत आहेत असें दिसतें. सिलोनच्या सरकारनें 'बँक डेबिटस' वर कर बसविला आहे. इंडोनेशिआच्या सरकारनें त्या देशांत राहणाऱ्या परकीय नागरिकांवर खास कर बसविण्याचें ठरविलें आहे. कुटुंबप्रमुखावर दरसाल सुमारें ६,००० रुपये, त्याच्या पत्नीवर ३,२०० रुपये, प्रत्येक मुलावर १,६०० रुपये आणि कुटुंबांतील प्रत्येक इतर व्यक्तीवर दरसाल ३,२०० रुपये, अशा रीतीनें कर वसूल करण्यांत यावयाचा आहे. इंडोनेशिआची आर्थिक परिस्थिति सुधारण्याच्या सरकारच्या प्रयत्नांतून ह्या नव्या कराचा उगम झालेला आहे. इंडोनेशिआंत सुमारें ६ लाख चिनी नागरीक व ६०,००० डच नागरीक आहेत, असा अंदाज करण्यांत आला आहे. त्यांना अर्थातच हा कर द्यावा लागणार आहे. त्यांच्याशिवाय हजारों युरोपिअन व आशियांतील नागरीक जाव्हा व सुमात्रांत आहेत. तेहि ह्या कराच्या कक्षेंत येतील. कराचा कालावधि तीन वर्षांचा ठरविण्यांत आला असून ह्या कालाच्या सुरवातीला असलेली परकीयांची परिस्थिति कर आकारणीसाठी आधारभूत मागण्यांत येईल. इंडोनेशिअन सरकारचें काम करणारे परदेशीय नागरीक, राजनैतिक प्रतिनिधी, तीन महिन्यांपेक्षा कमी काल देशांत प्रवास करणारे हौशी प्रवासी व तीन महिन्यांच्या मुदतीनें रहाणारे परदेशीय नागरीक ह्यांच्याकडून कर घेण्यांत येणार नाहीं.

---

## अमेरिकेचें अनुकरण नको !

अमेरिकेंत शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची तिसरी वार्षिक बैठक भारताचे अमेरिकेंतील वकील श्री. गगन विहारी मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. ह्या प्रसंगीं जमलेल्या विद्यार्थ्यांसमोर बोलतांना श्री. मेहता म्हणाले कीं, सध्यां अमेरिकेंत सुमारें २,५०० हिंदी विद्यार्थी शिकत आहेत. आपलें ज्ञान वाढविण्याची व क्षितिज विस्तृत करण्याची उत्कृष्ट संधि त्यांना लाभली आहे. अमेरिकेंतील उत्पादनाचें तंत्र फारच कार्यक्षम आहे. पण हिंदी लोकांनीं अमेरिकेंतील उत्पादनाच्या पद्धति अंमलांत आणूं नयेत. त्यांना तसें करणें शक्यहि नाहीं. भारतामधील परिस्थिति अशी आहे कीं, पाश्चिमात्य देशांत ज्या प्रकारच्या ऐषआरामाच्या वस्तू आहेत, तशा भारतांत निर्माण करणें योग्य होणार नाहीं. आरामशीर मोटारगाड्या अथवा दूरचित्रवाणी ह्यांचें उत्पादन करण्यापूर्वी हिंदी जनतेच्या जीवनाच्या प्राथमिक गरजा भागविण्याकडे लक्ष देण्यांत आलें पाहिजे. भारताच्या पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत

शेती, उद्योगधंदे आणि व्यापार वृद्धिंगत झाले. त्यामुळें सुमारें ४५,००,००० लोकांना रोजगार मिळाला. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत शेतीचा व्यवसाय सोडून इतर व्यवसायांत ८०,००,००० लोकांना रोजगार देण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. तथापि, जरूर तीं साधनें नसतांना विकसित अर्थव्यवस्थेचा आदर्श पुढें ठेवण्यांत आला, तर अपयश पदरीं पडल्याशिवाय राहणार नाहीं.

## हातमागाच्या कापडाला बाजारपेठ मिळवून देण्याची योजना

### भारत सरकारचें ३ लक्ष रुपयांचें साह्य

खादीच्या विक्रीला उत्तेजन देण्यासाठी उत्तर प्रदेश, बिहार, केरळ, मुंबई आणि मद्रास या राज्य सरकारांना भारत सरकारनें सुमारें ३ लक्ष रुपयांपर्यंत आर्थिक साह्य देण्याचें मंजूर केलें आहे.

अगदीं ग्राहकांच्या दारापाशीं हातमागाचें कापड नेणाऱ्या तीन फिरत्या गाड्यांसाठी येणाऱ्या खर्चापैकी ३ खर्च भागविण्यासाठी मुंबई सरकारला आर्थिक साह्य मिळालें आहे.

उत्तर प्रदेश राज्यांतील आंतर–राज्यीय विक्रीभांडार आणि इतर ७ विक्रीभांडारें चालू राहण्यासाठी त्यांनाहि आर्थिक साह्य देण्यांत आलें आहे.

मद्रास हातमाग कोष्ट्यांची सहकारी सोसायटी सिकंदराबाद आणि कोचीन येथें प्रत्येकीं एक आंतर–राज्यीय विक्रीभांडार उघडणार असून त्याला साह्य करण्यासाठी मद्रास सरकारला ३०,००० रुपये देण्यांत आले आहेत.

सहकारी सोसायट्यांसाठी लागणाऱ्या १०० उमेदवारांना जमाखर्च आणि सहकार यांचें शिक्षण देण्यासाठी केरळ सरकारला भारत सरकारनें १५,००० रुपयांचें आर्थिक साह्य मंजूर केलें आहे.

हातमागाच्या कापडाच्या विक्रींत रिबेट देण्यासाठी मद्रास आणि बिहार सरकारांना २·७५ लाख रु. मिळाले आहेत.

### शेड्यूल्ड बँकांची तुलनात्मक परिस्थिति

| | (०००' वगळले आहेत) | |
|---|---|---|
| | २८-६-१९५७ | २९-६-१९५६ |
| | रु. | रु. |
| १. भारतांतील 'डिमांड' देणीं | | |
| (१) बँकांकडून घेतलेलीं कर्जें | ११,२५,३० | ६,११,७४ |
| (२) इतर 'डिमांड' देणीं | ७१२,९३,३२ | ६३१,९९,६४ |
| २. भारतांतील 'टाइम' देणीं | | |
| (१) बँकांकडून घेतलेलीं कर्जें | ४,१२,०० | ३,२२,३० |
| (२) इतर 'टाइम' देणी | ५४८,९०,२४ | ४४९,६५,७० |
| ३. स्टेट बँकेकडून घेतलेलीं कर्जें | | |
| (१) 'डिमांड' देणीं | ४,३९,५४ | ५,३६,४४ |
| (२) 'टाइम' देणा | — | — |
| ४ रिझर्व्ह बँकेकडून घेतलेलीं कर्जें | ६२,०९,४९ | ५३,२२,३८ |
| ५. कॅश | ४२,३७,६९ | ४०,०६,६३ |
| ६. रिझर्व्ह बँकेंत शिल्लक | ७८,७२,१९ | ५१,८२,५८ |
| ७. इतर बँकांत शिल्लक, चालू खात्यावर | १४,४३,६८ | १४,७६,२१ |
| ८. कॉल व शॉर्ट नोटिस मनी | १८,२८,८५ | ११,१९,५२ |
| ९. इन्व्हेस्टमेंटस (ट्रेझरी बिलें व ट्रेझरी डि. रिसिट्स वगळून) | ३३२,७१,२६ | ३४७,६२,९२ |
| १० दिलेलीं कर्जें | ७४६,०२,६२ | ६११,२३,०८ |
| ११. खरीदलेलीं व डिस्कौंट केलेलीं इनलँड बिलें | ११८,९०,९३ | ९८,७८,७९ |
| १२. खरीदलेलीं व डिस्कौंट केलेलीं विदेशी बिलें | ५४,१३,९८ | ४७,४५,२६ |


## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. इ. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. घंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार प. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.



## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० |
| | रु. ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. १३,३५,२४,००० |

१४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

## दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें पहिलें वर्ष (१९५६–५७)

### खर्च व त्याची तरतूद

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षांत (१९५६–५७) सर्वसाधारण परिस्थिति तितकीशी अनुकूल नसूनहि कांहीं क्षेत्रांत विशेष आणि एकंदरीनें पाहतां बऱ्यांपैकी प्रगति झाली, असें नियोजन मंडळानें सदर वर्षांतील प्रगतीबाबत घेतलेल्या आढाव्यावरून दिसून येतें.

सदर वर्षांत सुवेझ प्रश्न, देशांतील भाववाढीची प्रवृत्ति, पोलाद व सिमेंट यांसारख्या कांहीं विशिष्ट पदार्थांची विशेष टंचाई व हुंडणावळीची घसरगुंडी यांसारख्या अनेक अडचणींस तोंड द्यावें लागलें.

### अंदाजें खर्च व जमेच्या बाबी

पुनर्रचित राज्यांनीं व केंद्रशासित प्रदेशांनीं १९५६–५७ मधील खर्चाचें जें दुरुस्त अंदाज पाठविले त्यानें खर्चांत ३९१ कोटी रु. ची भर पडली. मध्यवर्ति सरकारी खात्यांच्या खर्चाचा अंदाज सुमारें ३७० कोटी रुपये होतो. अशा रीतीनें दुसऱ्या योजनेच्या दुरुस्त अंदाजाप्रमाणें ह्या वर्षांतील एकूण खर्च ७६१ कोटी रुपये होतो. प्रत्यक्ष खर्चाचे आंकडे अद्यापि उपलब्ध नाहींत.

विकास कार्याच्या पुढील बाबींवर विभागलेला खर्च पुढें दिलेला आहे :—

| विकासाची बाब | अंदाज | कोटी रु. दुरुस्त अंदाज |
|---|---|---|
| १. शेतकी व समाज विकास ... | १०८ | ९३ |
| २. वीज व पाटबंधारे ... | १८१ | १७९ |
| ३. उद्योगधंदे व खाणी ... | १२१ | १११ |
| ४. वहातूक व दळणवळण ... | २४७ | २३३ |
| ५. समाजसेवा ... | १४३ | १२३ |
| ६. संकीर्ण ... | ३० | २२ |
| एकूण ... | ८३० | ७६१ |

दुरुस्त अंदाजाचा विचार करून ह्या ७६१ कोटी रुपयांच्या खर्चाच्या तरतुदींची व्यवस्था पुढीलप्रमाणें होती :—

| | कोटी रु. |
|---|---|
| १. योजनेवरील खर्च | ७६१·० |
| २. अर्थसंकल्पांतील तरतूद | ४२७·२ |
| ३. परदेशांहून मिळणारी मदत | ६३·१ |
| ४. वरील क्र. २ व ३ मिळून एकूण रक्कम | ४९०·३ |
| ५. क्र. १ व ४ यामधील तफावत | २७०·७ |

मध्यवर्ति सरकारकडून योजनेसाठी चालू महसुलांतून १०२ कोटी रुपये मिळाले. रेल्वेच्या विकास कार्यक्रमासाठी रेल्वेच्या चालू उत्पन्नांतून सुमारें ४२ कोटी रुपये मिळाले. अशा रीतीनें मध्यवर्ति सरकारकडून चालू महसुलांतून अंदाजें सुमारें १४४ कोटी रुपये मिळाले.

### कर्जानें रक्कम कमी जमली

मध्यवर्ति सरकारनें बाजारांतून ७८·१ कोटी रुपये उसने मिळविले. सदर वर्षांत उभारलेल्या कर्जाचा आंकडा अर्थसंकल्पांतील १००·६ कोटी रुपयांच्या अंदाजापेक्षा सुमारें ५७ कोटी रुपयांनीं जास्त झाला होता. परंतु १९५७–५८ मध्यें मुदत संपणाऱ्या कर्जरोख्यांचें रूपांतर करून घेण्यासाठी दिलेल्या सवलतीमुळें प्रत्यक्ष रोख रक्कम अर्थसंकल्पांतील संकलित आंकड्यांपेक्षा कमीच मिळाली. छोट्या बचतीच्या योजनेनुसार गोळा झालेल्या रकमेंतें मध्यवर्ती सरकारचा वांटा अंदाजें ४५·२३ कोटी रुपये होता असा अंदाज आहे. एकूण अंदाजें रक्कम ६४·६ कोटी रुपये असून ती त्या मागील वर्षाच्या प्रत्यक्ष रकमेपेक्षा १·०५ कोटी रुपयांनीं कमी आहे. 'इतर बाकी' या खात्याकडील अंदाजें उत्पन्न ४२ कोटी रुपये होते.

परकीय साह्यानें ६३ कोटी रुपयें जमेस धरून मध्यवर्ति सरकारची एकूण जमा ३९० कोटी रुपये होती. योजनेचा अंदाजें खर्च मात्र ३६० कोटी रुपये आहे. राज्यांना द्यावयाच्या साह्याचा २३५·५ कोटी रुपयांचा आंकडा लक्षांत घेतां मध्यवर्ति सरकारची तूट अंदाजें सुमारें २१६ कोटी रुपयांची आहे.

वर सादर केलेल्या अंदाजावरून विचार करतां योजनेसाठी लागणाऱ्या ३९१ कोटी रुपयांचा खर्च भागविण्यासाठी राज्य सरकारकडून सुमारें १०० कोटी रु. उभारले गेले.

---

## जगांतील नैसर्गिक रबराचें उत्पादन

इंटरनॅशनल रबर स्टडी ग्रुप ह्या संघटनेचें १३ वें अधिवेशन जकार्ता येथें भरलें होतें. ह्या संघटनेमध्यें १९ राष्ट्रांचे प्रतिनिधी असून नैसर्गिक रबराचें उत्पादन, त्याच्या बाजारपेठा इत्यादि विषयासंबंधीं अभ्यास करण्याचें कार्य ती करीत असते. संघटनेनें रबराच्या उत्पादनाविषयीं असा अंदाज केला आहे कीं, चालू वर्षी १७,५०,००० टन नैसर्गिक रबर निर्माण करण्यांत येईल. गेल्या वर्षीचा उत्पादनाचा आंकडा १८,७२,५०० टन असा होता. संघटनेचे सभासद असलेल्या राष्ट्रांतील कृत्रिम रबराचें उत्पादन चालू वर्षी १२,८०,००० टन होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. सोव्हिएट रशिआंतील कृत्रिम रबराचें उत्पादन वरील आंकड्यांत जमेस धरलेलें नाहीं. १९५७ सालीं जगांत २९,१२,००० टन नैसर्गिक रबराचा खप होईल आणि १२,६०,००० टन कृत्रिम रबराचा खप होईल असा कयास करण्यांत आला आहे. चालू वर्षीच्या नैसर्गिक रबराच्या उत्पादनांत बहुधा इंडोनेशिआ पहिला अनुक्रम पटकावील. इंडोनेशिआंत ६,२७,००० टन रबर निर्माण करण्यांत येईल असें दिसतें. रबराच्या उत्पादनांत तिसरा अनुक्रम सयामचा लागेल; सयाममध्यें १,३४,००० टन रबर निर्माण होऊं शकेल. सयामच्या खालोखाल सीलोनचा अनुक्रम लागेल. सीलोनमधील उत्पादन ९०,००० टनांपर्यंत जाईल. नैसर्गिक रबराच्या किंमतींत जे चढउतार होतात, त्यांचा अभ्यास करण्याचें काम पुढच्या बैठकींत हातीं घेण्याचें संघटनेनें ठरविलें आहे.

---

## बँक ऑफ इंडिया लि.,

वरील बँकेस १९५७ च्या पहिल्या तिमाहींत ४२,३४,४५८ रु. नफा झाला. १२% करमाफ इंटेरिम डिव्हिडंड डायरेक्टरांनीं देण्याचें ठरविलें आहे. ३ कोटी रु. वसूल भांडवलावर १८ लक्ष रु. डिव्हिडंडसाठी लागतील.

## रिझर्व्ह बँकेचें गेलें वर्ष

### झालेल्या नफ्याचें ताळेबंदांत प्रतिबिंब

रिझर्व्ह बँकेचें वर्ष जून अखेर संपतें. सहाजिकच ५ जुलै रोजींचा रिझर्व्ह बँकेचा तक्ता महत्त्वाचे बदल दर्शवितो. १९५६–५७ मध्यें बँकेच्या दोन्ही खात्यांच्या जिंदगींत बरीच वाढ झाली. व्याजाचा दरहि जास्त होता, त्यामुळें गेल्या वर्षी बँकेला नफाहि भरपूर झाला असला पाहिजे, हें उघड आहे. बँकेजवळील सोन्याची किंमत वाढवून दाखविल्यामुळेंहि वाढावा वाढला. बँकेचा रिझर्व्ह फंड ५ कोटी रु. चा एकदम ८० कोटी रु. वर गेला आहे. इन्श्यू खात्यांतील सोन्याची किंमत वाढवली, तेव्हांच ठरविण्यांत आलें होतें कीं त्यामुळें होणाऱ्या ७७·७४ कोटी रु. वाढाव्यापैकीं ७५ कोटी रु. रिझर्व्ह फंडांत वर्ग करण्यांत यावेत; आणि बाकीची रक्कम नफ्यांत समाविष्ट करण्यांत यावी. नॅशनल ॲग्रि. क्रेडिट (लाँग टर्म ऑपरेशन्स) फंड आतां ५ कोटींनीं वाढून २० कोटी रु. झाला आहे, आणि नॅशनल ॲग्रिकल्चरल क्रेडिट (स्टॅबिलायझेशन) फंड १ कोटीनें वाढून तो २ कोटी रु. झाला आहे. बँकिंग खात्यांतील 'इतर देणीं' १२२ कोटी रु. वरून ७·९० कोटी रुपयांवर उतरलीं आहेत. 'इतर ठेवी' ११९·७८ कोटी रु. च्या १४९·६८ कोटी रु. झाल्या आहेत. सरकारला कृत्रिमपणें नोटा निर्माण करणें आवश्यक झालें नाहीं. कारण त्याला बँकेच्या नफ्याचा वाटा मिळाला असला पाहिजे. १९५७–५८ च्या बजेटांत ह्या वाट्याचे ३० कोटी रुपये मिळतील असा अंदाज केलेला आहे. तथापि, मध्यवर्ती सरकारच्या ठेवीची रक्कम फक्त १·३८ कोटी रुपयांनीं वाढली आहे. महिन्याच्या आरंभींच्या सरकारच्या मोठ्या खर्चाचा तो परिणाम असावा.

### रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग खात्याची देणें बाजू

#### वर्षअखेरीच्या हिशेबामुळें झालेले फरक

| देणीं | रु. |
|---|---|
| वसूल भांडवल | ५,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ८०,००,००,००० |
| नॅशनल ॲग्रि. के. (लाँगटर्म ऑपरेशन्स) फंड | २०,००,००,००० |
| नॅशनल ॲग्रि. के. (स्टॅबिलायझेशन) फंड | २,००,००,००० |
| ठेवी :— | |
| (अ) सरकारच्या | |
| (१) मध्यवर्ती सरकारच्या | ५३,१७,७७,००० |
| (२) इतर सरकारांच्या | ४,४६,६६,००० |
| (ब) बँकांच्या | ७५,८९,२९,००० |
| (क) इतर ठेवी | १४९,६८,५९,००० |
| बिल्स पेएबल | १३,८८,४२,००० |
| इतर देणीं | ७,९०,२७,००० |
| रुपये | ४१२,०१,००,००० |

## बेळगांव बँक लि.

### डॉ. पंजाबराव देशमुखांची भेट

युनियन सहकार मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांनीं गेल्या ६ तारखेस बेळगांव बँकेस भेट दिली. बँकेनें केलेली प्रगति ऐकून त्यांनीं समाधान व्यक्त केलें. ग्रामीण विभागांत सहकारी बँकांप्रमाणेंच स्थानिक व्यापारी बँकांनाहि कार्य करण्यास सवलती मिळाल्यास त्या जास्त कार्यक्षमतेनें कार्य करून दाखवितील, ह्या बोर्डातर्फे श्री. गोविंदराव सराफ यांनीं केलेल्या सूचनेस "कार्यक्षम स्थानिक बँकांना संधि देण्याचा प्रश्न विचारासाठी येईल तेव्हां याचा अवश्य सहानुभूतिपूर्वक विचार करूं" असें आश्वासन डॉ. देशमुख ह्यांनीं दिलें. त्यांचेबरोबर म्हैसूरचे माजी अर्थमंत्री श्री. दासप्पा, एम्. पी. हेहि आले होते.

---


### —पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड—

लक्ष्मी रोड, पुणें नं. २.

## नोटीस

या बँकेच्या सन १९५७–५८ च्या संचालकमंडळाची निवडणूक व्हावयाची आहे. त्यासाठी वैयक्तिक मतदारांची यादी तयार झाली असून ती बँकेच्या मुख्य कचेरींत व शाखा-कचेऱ्यांच्या नोटीसबोर्डावर निवडणुकीचे नियम नं. ३ प्रमाणें लावण्यांत आली आहे.

तरी निवडणुकीसाठी लायक उमेदवारांचीं नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सहीसह व उमेदवारांच्या लेखी संमतीनें शुक्रवार दिनांक ९–८–१९५७ रोजीं दुपारीं ४ वाजेपर्यंत अगर त्यापूर्वी बँकेच्या मुख्य कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवून यावींत.

सदर बाबतींत जास्त माहिती पाहिजे असल्यास ती बँकेच्या कामाच्या वेळांत मिळूं शकेल.

पुणें शहर, दि. १५–७–१९५७ — वा. ग. आळतेकर, कार्यकारी संचालक

### —पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड—

लक्ष्मी रोड, पुणें नं. २

## नोटीस

पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेच्या सन १९५७–५८ च्या हिशेबांची तपासणी करण्याकरितां येत्या वार्षिक साधारण सभेत दोन हिशेब–तपासनीसांची नेमणूक करावयाची आहे.

सदर जागांसाठी ज्यांना उमेदवार म्हणून उभें रहावयाचें असेल त्यांनीं आपले अर्ज बँकेच्या पुणें येथील मुख्य कचेरींत बुधवार दिनांक ३१–७–१९५७ रोजीं दुपारीं ४–० वाजेपर्यंत अगर त्यापूर्वी पोंचतील अशा बेतानें पाठवून द्यावेत.

उमेदवारानें सदर अर्जांत आपलें संपूर्ण नांव, पत्ता व शैक्षणिक लायकी नमूद केली पाहिजेत.

हिशेबतपासनीसांचे नेमणुकीबाबतचे बँकेनें केलेले नियम बँकेच्या मुख्य कचेरींत कामाचे वेळांत पहावयास मिळतील.

पुणें शहर, दि. १५ जुलै, १९५७ — वा. ग. आळतेकर, कार्यकारी संचालक

## घरगुती उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन आणि विकास

बेकारी कमी करणें आणि औद्योगिकरण करणें हीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेची प्रमुख उद्दिष्टें आहेत. घरगुती उद्योगधंदे आणि ग्रामोद्योगाचा विकास करणें हा बेकारी कमी करण्याचा प्रभावी मार्ग आहे. याबद्दल दुमत असूंच शकत नाहीं. त्यामुळें या उद्योगधंद्यांना स्वाभाविकपणेंच ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमांत फार महत्त्वाचें स्थान आहे.

### 'डायरेक्टर ऑफ स्मॉल इंडस्ट्रीज' चें स्वतंत्र खातें

मुंबई सरकारनें आर्थिक विकासाच्या दृष्टीनें घरगुती उद्योगधंद्यांचें महत्त्व ओळखून १९४६ मध्येंच सहकार खात्यांत औद्योगिक सहकार व ग्रामोद्योगाचे जॉईंट रजिस्ट्रार ह्यांच्या हाताखालीं त्यासाठीं एक वेगळा विभाग निर्माण केला. मुंबई राज्यांतील ग्रामोद्योग व घरगुती उद्योगधंद्यांच्या विकासाकडे तसेंच औद्योगिक सहकाराकडे या विभागाकडून लक्ष पुरविण्यांत येतें. या विभागाचें आतां स्वतंत्र अशा खात्यांत रूपांतर करण्यांत आलें असून जॉईंट रजिस्ट्रार यांचा हुद्दा बद्लून त्यांना आतां डायरेक्टर ऑफ स्मॉल इंडस्ट्रीज असें संबोधण्यांत येतें.

### औद्योगिक समिति

ग्रामोद्योग समितीची स्थापनाहि सरकारनें १९४६ मध्यें केली. ग्रामोद्योग व घरगुती उद्योगधंदे स्वयंपूर्ण बनविण्याच्या दृष्टीनें त्यांचा विकास व पुनरुज्जीवन करणें आणि कामधंदा मिळण्यासाठीं व्यापक क्षेत्र उपलब्ध करणें हीं या समितीची मुख्य उद्दिष्टें आहेत. १९५४ मध्यें मुंबई सरकारनें मुंबई ग्रामोद्योगविषयक कायदा करून या समितीचें मुंबई ग्रामोद्योग-मंडळ नांवाच्या स्थायी स्वरूपाच्या मंडळांत रूपांतर केलें. आर्थिक, तांत्रिक तसेंच विक्रीविषयक सोयी उपलब्ध करून ग्रामोद्योगास चालना देणें व त्याचा विकास करणें, शिक्षणाचे वर्ग चालविणें, सुधारलेल्या अवजारांचा व साहित्यांचा पुरवठा करणें आणि ग्रामोद्योगांबाबत प्रयोग वगैरे करून संशोधन करणें, हीं या मंडळाचीं प्रमुख कामें आहेत. ग्रामोद्योगांचा विकास करण्यासाठीं तसेंच ग्रामोद्योगाचें लोण खेडोंपाडीं पोंहोचविण्यासाठीं मंडळाच्या अधिकाराखालीं तीन विभाग होते ते वाढवून आतां नऊ करण्यांत आले आहेत. प्रत्येक विभागांत तीन ते चार जिल्हे असतात. मंडळांतील एका सभासदाच्या अधिकाराखालीं एक विभाग असतो व त्याच्या मदतीस स्थानिक समाजसेवकांची एक सल्लागार समिति असते. राज्य-सरकार मंडळाला वार्षिक ७ लाख रुपयांची ग्रँट देत असून अखिल भारतीय खादी ग्रामोद्योग मंडळाकडूनहि या मंडळास कांहीं मदत व कर्जे मिळतात.

### स्वयंपूर्णतेचें तत्त्व

ग्रामोद्योग व घरगुती उद्योगधंद्यांचें पुनरुज्जीवन करून स्वयंपूर्णतेच्या तत्त्वावर त्यांचा विकास करण्याच्या कामीं मंडळानें सरकारला अनेक दृष्टीनें साहाय्य केलें आहे. १९५१-५२ ते १९५५-५६ दरम्यान म्हणजे नोव्हेंबर १९५६ अखेर पर्यंत ग्रामीण भागांतील सुमारें ७०,००० कारागिरांना मंडळानें कामधंदा मिळवून दिला, यावरून ग्रामोद्योगांचा विकास करून कारागिरांना कामधंदा मिळवून देण्याचे प्रयत्न किती यशस्वी झाले याची चांगली कल्पना येते.

मुंबई सरकारकडून ज्या ग्रामोद्योगांना मदत मिळते अशा ग्रामोद्योगांचे कापड-धंदा, अन्नधान्यविषयक धंदा आणि इतर उद्योगधंदे असे तीन मुख्य गट करतां येतील.

### कापड-धंदा

"खादी स्वयंपूर्णता योजने" खालीं हातानें सूत कातणाऱ्यांना व हातानें विणकाम करणाऱ्यांना मंडळाकडून शिक्षण देण्यांत येतें. यासाठीं शिक्षणकेंद्रेंहि चालविलीं जातात. अहवालाच्या काळांत अशा तऱ्हेचीं एकूण ५८३ केंद्रें चालविण्यांत आलीं. त्यांतून सूतकताई करणाऱ्या ४३,५१७ इसमांनीं २६,०१,६११ चौरस वार खादी तयार केली. बडोदें जिल्ह्यांत हरणी येथें एक आणि निर्वासितांच्या फायद्यासाठीं कल्याणनजिक उल्हासनगर येथें एक अशीं दोन खादीकेंद्रें चालविण्यांत आलीं. या केंद्रांतून १,२१५ इसमांना काम मिळालें व त्यांनीं ८,५३० चौरस वार कापड तयार केलें. निश्चित क्षेत्रांत कार्यान्वित करावयाच्या योजनेनुसार मंडळानें धारवाड जिल्ह्यांत २२ केंद्रें चालविलीं. या केंद्रांतून सूतकताई करणाऱ्या १,४०४ इसमांनीं जवळ जवळ ५५,२०० चौरस वार खादी तयार केली. विजापूर जिल्ह्यांतील दुष्काळी भागांतहि निमदुष्काळी काम म्हणून खादी काम सुरू करण्यांत आलें. त्यामुळें सुमारें २००० लोकांना कामधंदा मिळाला.

३० केंद्रांमधून व्यापारी तत्त्वांवर खादीचें उत्पादन करण्यांत आलें. या केंद्रांतून ११,४०९ लोकांना काम मिळालें व त्यांनीं एकंदर ६,८२,८८८ चौरस वार इतकी खादी तयार केली. जुन्या मुंबई राज्यांत लोकरधंद्यांच्या विकासाची योजनाहि मंडळानें हातीं घेतली. या योजनेमुळें ४४२ इसमांना काम मिळालें.

### अन्नपदार्थांचा उद्योगधंदा

अहवालाच्या काळांत मंडळानें ७२५ नीरा आणि ताडगूळ केंद्रें चालविलीं. या केंद्रांतर्फे १,०६,००० वर झाडें गाळण्यांत आलीं आणि १९,३७,००० वर गॅलन नीरा व ८९,७,००० वर रत्तल ताडगूळ यांचें उत्पादन करण्यांत आलें. या उद्योगधंद्यांत २,२३९ इसमांना कामधंदा पुरविण्यांत आला. यापैकीं बहुतेकजण पूर्वी ताडी गाळण्याचा व्यवसाय करीत असत.

मधुमक्षिकापालनाच्या उद्योगधंद्यांमुळें शेतकऱ्यांना जादा उत्पन्नाचें एक साधन मिळतें आणि शिवाय खेडेगांवांतील सुतारांनाहि कामधंदा मिळतो. या योजनेखालीं महत्त्वाच्या ठिकाणीं मधमाशा पाळण्याचीं केंद्रें स्थापन करण्यांत आलीं असून तेथें मधमाशा पाळणाऱ्यांना, कार्यकर्त्यांना, वगैरेंना मधुमक्षिका-पालनाचें शास्त्रोक्त शिक्षण देण्यांत येतें. अहवालाच्या काळांत राज्यांत अशा तऱ्हेचीं ५३ केंद्रें होतीं व तेथें ३७१० शेतकरी मधमाशा पालन करीत होते आणि ७,००० वर मधमाशांच्या वसाहती होत्या. या केंद्रांतून एकूण ३,४७,००० वर रत्तल मध उत्पादन करण्यांत आला. मधमाशा-पालनाच्या कार्यशास्त्रतचें संशोधन करण्यासाठीं बोर्डानें एक प्रयोगशाळा स्थापन केली आहे.

ग्रामीण तेलधंद्याच्या योजनेखालीं तेल्यांना स्टायपेंड देऊन ट्रेनिंग देण्यांत येतें. सुधारलेल्या तेल-घाण्या बसविण्यासाठीं कर्जें आणि आर्थिक मदत देण्यांत येतें आणि रजिस्टर्ड संस्थांना तेलबियांचा आणि तेलघाण्या तयार करण्यासाठीं लागणाऱ्या लांकडांचा संग्रह करण्यासाठीं कर्जें देण्यांत येतात. अहवालाच्या काळांत एकूण ५०७ तेलघाण्या चालू होत्या.

### मीठ उत्पादन

रत्नागिरी जिल्ह्यांत सहकारी सोसायट्यांमार्फत मिठाचें उत्पादन करण्यांत येत होतें. दोन मीठ उत्पादनाचीं केंद्रें काम करित होतीं व तेथें ९० इसमांना कामधंदा मिळून एकूण १२,८६,००० बंगाली मण इतकें मीठ उत्पादन झालें. हातानें तांदूळ सडणें हा

दुसरा असा उद्योगधंदा आहे कीं, ज्यामुळें खूप लोकांना कामधंदा मिळूं शकेल. अहवालाच्या काळांत हातसडणीच्या तांदुळाचीं १२२ केंद्रें चालूं होतीं व तेथें ९८,१००० बंगाली मण भात सडण्यांत आलें. या केंद्रांतून ४,२८१ इसमांना पूर्णवेळ आणि २५५ इसमांना अल्पवेळ कामधंदा मिळाला.

मंडळानें अलिकडेच गूळ-खांडसरीची योजना हातीं घेतली असून तीअन्वयें उसाच्या रसावर सुधारलेल्या पद्धतीनें प्रक्रिया करण्यांत येतें आणि शेतकऱ्यांना सवलतीच्या दरानें सुधारलेलीं अवजारें वगैरे पुरविण्यांत येतात.

### इतर उद्योगधंदे

हातबनावटीच्या कागदासंबंधींच्या योजनेखालीं मंडळामार्फत पुणें येथें एक हातबनावटीच्या कागदाबाबतचें केंद्र चालविलें. कागद उत्पादनाबाबतचें तंत्र व प्रक्रिया याबाबतचें संशोधन आणि कच्च्या मालाबाबतचे प्रयोग येथें करण्यांत येतात. अहवालाच्या काळांत ३,८२,२०० रुपये किंमतीचा कागद तयार करण्यांत आला व त्यामुळें ७९ लोकांना कागदधंदा मिळाला. मंडळामार्फत खानदेशमध्यें एरंडोल येथें लगदा तयार करण्याचें केंद्र चालविण्यांत येतें व तेथून कागद उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांना कागदाचा लगदा पुरविण्यांत येतो. सातारा येथें एक डिंक तयार करण्याचेंहि केंद्र आहे. मेणबत्त्या, स्लेटपेन्सिली, प्लॅस्टर ऑफ पॅरीस, खडू, वगैरे तयार करण्यासाठींहि मंडळामार्फत प्रयत्न करण्यांत आले.

चटया विणण्याच्या उद्योगधंद्याला उत्तेजन देण्याच्या योजनेखालीं मंडळामार्फत गांवकऱ्यांना चटया विणण्याचें शिक्षण देण्यांत आलें. खेडेगांवांत भरपूर प्रमाणांत मिळणाऱ्या सज्जी मातीचा उपयोग करून तयार करण्यांत येणाऱ्या कॉस्टिक सोड्याचा वापर करून मंडळानें साबणधंद्यालाहि उत्तेजन दिलें आहे. अलिकडेच मंडळानें न खाण्याच्या तेलांचा उपयोग करून साबण तयार करण्याचें काम हातीं घेतलें असून १९५४–५५ मध्यें साबणाबाबतची योजना सुरू केल्यापासून तेथें सुमारें १०० इसमांना कामधंदा मिळाला आहे. त्याचप्रमाणें घरगुती प्रमाणावर काड्याच्या पेट्या तयार करण्यासहि मंडळाकडून उत्तेजन दिलें जातें. याबद्दलची योजना १९५४–५५ सालीं हातीं घेण्यांत आली. आतां आठ कारखाने सुरू आहेत. या कारखान्यांतून १४९ इसमांना पूर्णवेळ आणि ४७ इसमांना अल्पवेळ कामधंदा मिळाला आहे. बांगड्याच्या वस्तू तयार करण्यासंबंधींच्या योजनेअन्वयें मंडळामार्फत रजिस्टर्ड संस्थांना कर्जें व आर्थिक मदत देण्यांत येतें. श्रीगोंदें येथील घायपातीच्या लागवडीच्या केंद्राचा विकास करण्याचेंहि काम मंडळानें हातीं घेतलें आहे.

---

**झेकोस्लोव्हाकिआंतील चित्रपट महोत्सव**—युरोपमधील तिसरा चित्रपट महोत्सव झेकोस्लोव्हाकिआंत सुरू झाला आहे. महोत्सवांत ३५ संपूर्ण चित्रपट व १४० अनुबोधपट दाखविण्यांत येत आहेत. एकूण ४२ स्पर्धक देशांनीं उत्सवांत भाग घेतला आहे. त्यांपैकीं बहुतेक देश कम्युनिस्ट गटाबाहेरचे आहेत.

**इजिप्तमधील अणुशक्ति केंद्र**—रशिआची मदत घेऊन इजिप्त स्वतःचें अणुशक्ति केंद्र स्थापन करीत आहे. केंद्राची जुळवाजुळव संपत आली असून ती पूर्ण झाल्यावर केंद्र इजिप्शिअन तंत्रज्ञांच्या हवालीं करण्यांत येईल. ह्या तंत्रज्ञांत दोन स्त्रिया आहेत.


खर्चांत बचत करा व पैसा शिलकीत टाका

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

जनता बचत योजना

व्याज : २½ टक्के

शाखा: फोर्ट, दादर, माहिम, पुणें, बेळगांव.

सुखी જીવનની પગદંડી

( ગૃહજીવનનું માંગલ્ય )

લેખકઃ—શ્રી. વા. કાળે, સંપાદક, "અર્થ"

ગુજરાતી બીજી આવૃત્તિ ] [ કિંમત રૂા. ૧–૮–૦

बँक ऑफ पूना, लिमिटेड

–शेड्यूल्ड बँक–

- धंदा लहान असो अगर मोठ्या प्रमाणावर असो, पैशाची जरुरी सर्वांना भासते. बँकेकडून योग्य तारणावर कर्ज मिळूं शकतें.
- तसेंच, बँक अल्प मुदतीच्या ठेवी स्वीकारते.
- व्याजाच्या दराबद्दल अगर माहितीकरितां मुख्य ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांना भेटावें अगर लिहावें.

—शाखा—

( १ ) सदाशिव पेठ, पुणें.
( २ ) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
( ३ ) सांगली.

मुख्य ऑफिसः—
४५५ रविवार पेठ,
पुणें २.

गो. गं. साठे
मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.